आधुनिक विचारांचे

# वर्तमान




बीड । मंगळवार, ९ नोव्हेंबर २०२१ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : २ । पाने : ४ । मूल्य २ ₹

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

## फास्टट्रॅकन्यूज

### छत्रपती'च्या गळीत हंगामास उपस्थित रहा : मोहन जगताप

माजलगाव : छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. सोनाजीनगर, सावरगाव या



कारखान्याचा सन २०२१-२२ चा आठवा गळीत हंगाम शुभारंभ कारखान्याचे चेअरमन बाजीराव सोनाजीराव जगताप यांचे अध्यक्षतेखाली व ह.भ.प.हंसराज महाराज मिसाळ, ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ, ह.भ.प.एकनाथ महाराज माने, ह.भ.प.भागवत महाराज शिंदे, ह.भ.प.तुकाराम महाराज शास्त्री यांचे शुभहस्ते आज मंगळवार, दिनांक ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता करण्याचे योजिले आहे. तरी या कार्यक्रमास उस उत्पादक सभासद, शेतकरी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहन जगताप व सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक महेश सागरे यांनी केले आहे. दरम्यान, माजलगाव तालुक्यात ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे, त्या दृष्टीने कारखान्याने गाळपाचे नियोजन केले असल्याचे कारखान्याचे व्हाईस चेअरमन जगताप यांनी सांगितले.

# महाविकास आघाडी सरकार भक्कम

## मंत्री धनंजय मुंडे यांना ठाम विश्वास



प्रतिनिधी

परळी : राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार अत्यंत मजबूत स्थितीत आहे. राज्याचे पूर्वी मुख्यमंत्री व मंत्री राहिलेले अनुभवी या सत्तेत सहभागी आहेत. त्यामुळे विरोधकांचे सर्व डाव परतवून लावण्याची ताकत महाविकास आघाडी मध्ये आहे. विरोधकांना सर्व प्रकारे तोंड द्यायला आम्ही सक्षम आहोत, असे मत राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

मंत्री धनंजय मुंडे व मुंडे कुटुंबियांच्या वतीने परळी मतदारसंघातील नागरिक व कार्यकर्त्यांसाठी येथील हालगे गार्डन येथे दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी पालकमंत्री मुंडे बोलत होते. पालकमंत्री धनंजय मुंडे बोलण्यापूर्वी मनोगत व्यक्त केलेल्या आमदार संजय दौंड यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत, धनंजय मुंडे म्हणाले की, अनेकांना माझ्यात दिवंगत गोपीनाथराव मुंडे साहेब दिसतात, असे म्हणतात, अनेकांना दिवंगत पंडितराव मुंडे यांच्या स्वभावाचीही माझ्यात झलक दिसते. माझ्यात त्यांच्यापैकी कोणाची झलक दिसते कि नाही, हे माहीत नाही, मात्र दिवंगत पंडितराव मुंडे यांचा मुलगा म्हणून इथल्या मातीतील लोकांना व कार्यकर्त्यांना दिलेला प्रत्येक शब्द मी पूर्ण करणार आहे. दरम्यान, मागील काळात कोविड मुळे व त्याअनुषंगाने लावण्यात आलेल्या निर्बंधांच्या काळात अनेक सण उत्सव नागरिकांना आपापल्या घरात बसून साजरे करावे लागले. पण यापुढे कोविड नसेल तर दिवाळी स्नेहमिलनाचा हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करू असेही धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी त्यांनी उपस्थितांना दीपावली व भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार संजय दौंड, ज्येष्ठ नेते दत्ता पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर आमदार संजय दौंड, सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, दत्ता पाटील, राजकिशोर मोदी, जि.प.गटनेते अजय मुंडे, न.प. गटनेते वाल्मिक कराड, शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव, सावता परिषदेचे अध्यक्ष कल्याण आखाडे, रा.कॉ.चे परळी तालुकाध्यक्ष लक्ष्मण पौळ, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष ताराचंद शिंदे, ज्येष्ठ नेते सोमनाथ हालगे, नामदेवराव आघाव, बाजीराव धर्माधिकारी, चंदूलाल बियाणी, दीपक देशमुख, बालाजी मुंडे, जानिमिया कुरेशी, मार्केट कमिटीचे सभापती ॲड.गोविंदराव फड, राजेश्वर चव्हाण, माऊली मुंडे, घोडके, मिलिंद आवाड, नगराध्यक्ष मंजूर शेख, डॉ.नरेंद्र काळे, विष्णुपंत सोळंके, शकिल कुरेशी उपस्थित होते.



# 'दीपपर्व' दिवाळी अंकाची गुणवत्ता सिध्द

## प्रकाशनप्रसंगी उद्योगपती माधव निर्मळ यांचे गौरवोद्गार

प्रतिनिधी

धारूर : सर्व क्षेत्रातील प्रगतीसाठी वर्तमानपत्रांचे योगदान उल्लेखनीय आहे. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा आढावा घेवून वर्तमान माध्यम समुहाच्या दीपपर्व विशेषांकाने आपले वेगळेपण सिध्द केले आहे, असे गौरवोद्गार नर्मदा उद्योग समुहाचे सर्वेसर्वा उद्योगपती माधव निर्मळ यांनी काढले. ते दीपपर्व विशेषांकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलत होते.

धारूर येथे उद्योगपती माधव निर्मळ यांच्या निवासस्थानी शुक्रवार, दि.५ नोव्हेंबर रोजी वर्तमान माध्यम समुहाचा 'दीपपर्व २०२१' या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती कल्याण आबुज, मनोहर डाके, उत्तम तोष्णीवाल, देवा लोंढे, 'वर्तमान'चे संपादक भगीरथ तोडकरी, बाबा देशमाने आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना माधव निर्मळ म्हणाले, प्रत्येक क्षेत्रातील विकासासाठी वर्तमानपत्रांचे योगदान आहे.

वर्तमान माध्यम समूह सामाजिक जाणिवा जपत पत्रकारिता करत आहे. विविध विषयांची दर्जेदार मांडणी करून 'वर्तमान'ने अल्पावधीत गुणवत्ता सिध्द केली आहे. 'वर्तमान'च्या पत्रकारितेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. सकारात्मक पत्रकारिता काय असते, याचा वस्तुपाठ 'वर्तमान'ने घालून दिला. विविध सामाजिक प्रश्न, विकासकामांचे वार्तांकन, वंचित, उपेक्षितांच्या समस्या वर्तमानपत्रांच्या माध्यमातून प्रशासन, शासनासमोर यायला हव्यात. यासाठी सर्वच वर्तमानपत्र व पत्रकारांनी लेखन करायला हवे. 'वर्तमान' ने या प्रश्नावर लेखन केल्यानेच वाचकांच्या पसंतीला उतरले असल्याचे उद्गार उद्योजक माधव निर्मळ यांनी काढले.



# संपादकीय

## 'प्रकाशपर्व'च्या शुभकामना!

दिपावली मांगल्याचा उत्सव या प्रकाशपर्वच्या निमित्ताने सर्वांच्या कल्याणाची शुभकामना करूया. दिवाळीची चाहूल लागली की, अंगात नवा उत्साह संचारतो. दिवाळी हे प्रकाशपर्वच असतं. घरोघरी लागलेला प्रत्येक दिवा, विद्युत रोषणाई निराळा संदेश देत असते. हा सण घरातलाच नाही, तर मनातला अंध:कारही दूर सारतो. दिव्यांच्या प्रकाशात उदासीनता, निराशा नावालाही राहात नाही. वसुबारसपासून सुरू होणारी दिवाळी भाऊबीज आणि पुढे त्रिपुरारी पौर्णिमेपर्यत असते. या काळात वातावरणात एक वेगळीच सकारात्मकता भरून राहिल्याची जाणीव वारंवार होत असते. तेजाळलेली ही पृथ्वी मनाला उभारी देत असते. आयुष्यातला अंध:कार दूर करून प्रकाशाच्या दिशेने मार्गक्रमण करण्याची वाट हा सण दाखवत असतो. दिवाळी फक्त चार दिवसांची नसते, तर हे प्रकाशपर्व आपल्या मनात कायमचं घर करून राहतं. म्हणूनच मला दिवाळी खूप आवडते. खरं तर, अभिनयाच्या क्षेत्रात आल्यापासून माझी दिवाळी सेटवरच साजरी होत असते. चित्रीकरणादरम्यान सुट्टी मिळाली की, माझी पावलं घराकडे वळतात आणि कुटुंबीयांसोबत मी हे प्रकाशपर्व साजरं करते. मला पणत्या लावायला, घर सजवायला आणि या प्रकाशपर्वाच्या निमित्ताने येणारी सकारात्मकता अनुभवायला खूप आवडतं. मला रांगोळी काढायलाही खूप आवडतं. प्रत्येक दिवाळी मला वेगळा अनुभव देऊन जाते. यंदाची दिवाळीही माझ्यासाठी खास आहे. कारण मी नुकतीच माझी निर्मिती संस्था सुरू केली असून माझा पहिला लघुपट प्रदर्शित होतो आहे. दिवाळीच्या निमित्ताने, दिवाळी या विषयाला वाहिलेला विषय मी लोकांसमोर आणते आहे. माझ्या लेखी दिवाळीचं महत्त्व काय आहे, हा सण मी कसा साजरा करते हे सगळं मी माझ्या लिखाणातून लोकांपर्यत, चाहत्यांपर्यत पोहोचवणार आहे. दिवाळीतली माझ्या आवडीची खास गोष्ट म्हणजे फराळ. घराघरांमधून पदार्थांचा घमघमाट येऊ लागला की, दिवाळी जवळ आल्याची जाणीव तीव्र होऊ लागते. कुणी चकली करत असतं, तर कोणी बेसनाचे लाडू वळत असतं. यानिमित्ताने करंजी, कडबोळी, अनारसे, शंकरपाळी, शेव असं बरंच काही केलं जातं. अनारसे, शेव हे माझे विशेष आवडीचे पदार्थ असले, तरी फराळाच्या प्रत्येक पदार्थावर मी ताव मारते. अर्थात डाएटचं भान राखूनच! घरी फराळ बनत असताना मी मदतही करते. फराळ करता करता नात्यांचे बंध घट्ट होऊ लागतात. जावा-जावा, नणंद-वहिनी, सासू-सुना एकमेकींच्या मैत्रिणी कधी होऊन जातात हे कळत देखील नाही. एक-एक पदार्थ बनवण्यात प्रत्येकीचा हातखंडा असतो. इथे गृहिणीचं पाककौशल्य पणाला लागत असतं. मेहनतीने केलेल्या या फराळाचं होणारं कौतुक गृहिणीला वेगळाच आनंद देऊन जातं. गोडाधोडाचे पदार्थ करताना आणि खाताना हा गोडवा नात्यांमध्ये मुरत जातो. दिवाळीत अनेकांच्या हातांना रोजगार मिळतो. विशेषत: महिला उद्योजिकांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध करून देणारा हा सण आहे. आपल्या महिलांनी केलेला दिवाळीचा फराळ जगाच्या पाठीवर पोहोचला आहे. कंदील, दिवे, पणत्या तयार करणारे आणि विकणारेही दिवाळीकडे डोळे लावून बसलेले असतात. दिवाळीसाठी सजलेला बाजार बघून मन अगदी प्रसन्न होऊन जातं. सगळं कसं सकारात्मक वाटू लागतं आणि ही सकारात्मकता पुढे बराच काळ टिकून राहते. मला वाटतं की, सणांचं आपल्या आयुष्यात खूप महत्त्व आहे. त्यातही गेलं वर्ष, दोन वर्ष प्रत्येकजण वेगवेगळ्या आघाड्यांवर लढत आहे. अशा परिस्थितीत सण आपल्याला वेगळीच ऊर्जा देऊन जातात. एक वेगळाच उत्साह अंगात संचारतो. गेला काही काळ आपलं अनेक कारणांनी मानसिक खच्चीकरण झालं आहे. पण दिवाळीसारखा प्रकाशमय सण या सगळ्यावर उतारा ठरतो. बाहेरचा प्रकाश आपल्या मनाला एक वेगळी उभारी देतो आणि आपलं जगणंच बदलून टाकतो. आपण आशेवर जगत असतो आणि जगण्यासाठी आशेचे किरण ठरतात ते आपले भारतीय सण. प्रत्येक सणाचं महत्त्व वेगळं, साजरा करण्याची पद्धत वेगळी; पण हे सण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपली साथसंगत करत असतात. जगण्याला नवा अर्थ देत असतात. सण येणार म्हटल्यावर प्रत्येकजण उत्साहाने तयारीला लागतो. घरोघरी साजऱ्या होणाऱ्या दिवाळीची तयारी तर खूप आधीपासून सुरू होते. घराच्या साफसफाईची मोहीम हाती घेतली की, दिवाळीचे वेध लागायला सुरुवात होते. दिवाळीच्या लखलखाटात मनावरचं मळभही असंच दूर होत असतं. माणसं एकत्र येत असतात. गैरसमज दूर होत असतात. आपण गणेशोत्सवही याच उत्साहाने साजरा करतो. मात्र यंदा गणपतीच्या वेळी तिसऱ्या लाटेचा धोका होता. पण सरकारने केलेले प्रयत्न, लादलेले कडक नियम तसंच मोठ्या प्रमाणावर झालेलं लसीकरण यामुळे आता परिस्थिती नियंत्रणात आहे आणि लोकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. ही दिवाळी जल्लोषात आणि आनंदात साजरी होत आहे. पुढे सगळं छान होईल, असा संदेश ही दिवाळी देत आहे, असं मला वाटतं. म्हणून ही दिवाळी आपल्या दृष्टीने खूप महत्त्वाची वाटत आहे. अर्थात, सगळं छान आणि गुडी गुडी वाटत असलं तरी कोरोनाचं संकट गेलेलं नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवं. मास्क लावून फिरणं कोणालाही आवडत नाही. मास्क लावणं हे आपल्याला एक बंधन वाटू लागलं आहे. पण जिथे आपल्याला पर्याय नाही, तिथे उगाचच बंड पुकारून उपयोग नसतो. त्यामुळे बाहेर गेल्यावर मास्क लावा. सुरक्षित अंतर राखा, हात स्वच्छ धुवा. उगाचच गर्दी करू नका. दुसरं म्हणजे कोरोना विषाणूचा खूप मोठा परिणाम आपल्या श्वसनयंत्रणेवर होतो.

# उत्तरप्रदेशात प्रियांकास्त्राची जादू?

**उत्तर प्रदेशात पुढच्या वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा चेहरा म्हणून प्रियांका गांधी असणार आहेत. त्या योगी आदित्यनाथ सरकारला धारेवर धरतायत. लडकी हूँ, लढ सकती हूँ अशी एक नवी घोषणा करून लोकांच्या मनात प्रियांका गांधींनी स्थान निर्माण करायचा प्रयत्न केलाय. ही घोषणा करताना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेसच्या ४० टक्के उमेदवार या महिला असतील, असं जाहीर केलंय.**



आज-काल

**डॉ. जयदेवी पवार**

उत्तर प्रदेशात पुढच्या वर्षी विधानसभा निवडणुका होतायत. या निवडणुकीत काँग्रेसची भूमिका काय असेल, याकडे सगळ्यांचं लक्ष आहे. उत्तर प्रदेशच्या राजकारणात काँग्रेसला आधीच समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष यांची मोठी स्पर्धा आहे. भाजपविरोधी मतं एकवटताना भाजपबरोबरच या दोन पक्षांचा मुकाबलाही काँग्रेसला करावा लागणार आहे. अर्थात, या पक्षांबरोबर काँग्रेसने युती केली तर गोष्ट वेगळी; पण सध्या तरी अशी काही चिन्हं नाहीत.

नवी घोषणा काँग्रेसला तारेल?

उत्तर प्रदेश काँग्रेसची धुरा प्रियांका गांधी-वधेरा यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. प्रियांका गांधींनी ही जबाबदारी मोठ्या आक्रमकपणाने पार पाडायची, असं ठरवलेलं दिसतं. लखीमपूर खिरी इथं ३ ऑक्टोबरला झालेल्या घटनेत ८ व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यावेळी प्रियांका गांधी आक्रमकपणे उत्तर प्रदेशच्या पोलिसांबरोबर वाद घालत असल्याचे फोटो आणि वीडियो सगळीकडे प्रदर्शित झाले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना त्यावेळी प्रियांका गांधींमधे इंदिरा गांधीच दिसल्या. प्रियांकांमधे इंदिरा गांधींचे कोणते गुण आहेत, ते येणारा काळच ठरवेल; पण उत्तर प्रदेशात त्यांनी आक्रमकता दाखवत पक्षाचं नेतृत्व करायचं ठरवलंय, याची मात्र पदोपदी प्रचिती येत आहे. आधी लखीमपूर खिरीमधे त्यांनी योगी आदित्यनाथ सरकारला धारेवर धरलं आणि आता लडकी हूँ, लढ सकती हूँ' अशी एक नवी घोषणा करून लोकांच्या मनात स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. ही घोषणा करताना प्रियांकांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेसच्या ४० टक्के उमेदवार या महिला असतील, असं जाहीर केलंय. त्यांनी एक संदेश मतदारांना दिला आहे. अर्थात, केवळ महिला उमेदवारांबद्दल घोषणा करून भागणार नाही. प्रत्यक्षात कोणत्या महिला उमेदवार असतील आणि त्या उमेदवार असतील तर इच्छुक पुरुष उमेदवार हे कितपत आणि कसे स्वीकारतील, याबद्दल कुणाला काही अंदाज नाही. मात्र, ही घोषणा करून काँग्रेसमधे प्रियांकांनी जान आणण्याचा प्रयत्न नक्कीच केला आहे.

राजकीय पक्षांचं महिला धोरण

महिलांना अधिक प्रतिनिधित्व देण्यासाठी असा निर्णय घेणाऱ्या प्रियांका एकट्याच नाहीत. दोन वर्षापूर्वी पश्चिम बंगालमधे ममता बॅनर्जी यांनी लोकसभा निवडणुकांसाठीच्या ४२ जागांपैकी १७ जागांवर महिला उमेदवारांना तिकिटं दिली होती. प्रियांकांच्या निर्णयानंतर अलीकडेच दीदींनी ४० टक्के तिकिटं महिलांना देण्यात आपलाच पहिला नंबर असल्याचं ट्विटही केलं. राजकीय पक्ष निवडणुकांमधे तिकीटवाटपादरम्यान नेहमीच महिलांना अधिक संधी देण्याच्या घोषणा करत असतात. २०१९च्या लोकसभा निवडणुकांमधे ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी या राज्यातल्या ३३ टक्के जागांवर बीजू जनता दलाच्या महिला उमेदवारांना उमेदवारी देण्याची घोषणा केली होती. देशभरातल्या सर्वच राजकीय पक्षांकडून आपापल्या संघटनांमधे महिलांसाठी स्वतंत्र विभाग किंवा आघाडी तयार केली जाते. पण आजही लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महिला प्रतिनिधींची संख्या खूप कमी आहे. १९९० च्या दशकात स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय शरद पवार यांच्या पुढाकाराने घेण्यात आला.

राजकारणातलं महिलांचं प्रमाण

विधानसभा आणि लोकसभेत महिलांना आरक्षण देण्याचा मुद्दा अनेक वर्ष भिजत पडला आहे. महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूरच होऊ शकत नाही, असं चित्र काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात दिसलं. काँग्रेसनं राज्यसभेत हे विधेयक मंजूर करून घेतलं. पण लोकसभेत मुलायमसिंह यादवांचा समाजवादी पक्ष आणि लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल यासारख्या पक्षांमुळे महिला आरक्षणाचं विधेयक मनमोहन सिंग सरकारला लोकसभेपुढे मांडताही आलं नव्हतं. गेल्या ७ वर्षातही याबद्दल सकारात्मक पावलं पडताना दिसून आली नाहीत. विशेष म्हणजे, जगभरात राजकारणात महिला सक्रिय होण्याचं प्रमाण वाढत आहे. या यादीत रवांडाचं स्थान पहिल्या क्रमाकांवर आहे. सप्टेंबर २०१३ला या देशात झालेल्या निवडणुकांमधे महिलांचं विजयाचं प्रमाण ६३.८ टक्के होतं. जगातली ही पहिलीच घटना होती की, महिला खासदारांचं प्रमाण ६० टक्क्यांवर पोचलेलं होतं. आजही हे प्रमाण ६१.२३ टक्के इतकं आहे. दक्षिण आशियातल्या आपल्या शेजारच्या देशांची स्थिती पाहिल्यास श्रीलंकेत महिलांनी अध्यक्षपद आणि पंतप्रधानपद सांभाळलेलं असतानाही संसदेत महिलांचं प्रमाण एक टक्क्याहून कमी आहे. नेपाळमधे आतापर्यत कधीही महिला पंतप्रधान झाल्या नाहीत. मात्र, संसदेतल्या महिलांचं प्रमाण हे ३० टक्के दिसून आलं. चीनमधे महिला प्रतिनिधींचं प्रमाण २५ टक्के आहे. गेल्या काही वर्षात अरब राष्ट्रांमधे महिलांचा राजकारणातला सहभाग वाढताना दिसतोय.

काँग्रेसमधल्या बंडाळीचं काय?

भारतातही असं दृश्य दिसून येतं; पण राजकीय पक्षांच्या निवडून येण्याचे निकष हा यातला मोठा अडसर आहे. या पार्श्वभूमीवर प्रियांका गांधींनी घेतलेला निर्णय आशादायक ठरणारा आहे.

पण काँग्रेस पक्षाची आजवरची परंपरा पाहता घराणेशाहीची जपणूक करत त्या पक्षातल्या जुन्या जाणत्या नेत्यांच्या कुटुंबातल्या महिलांनाच पुन्हा संधी देतात की नव्या चेहऱ्यांना, हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल. उत्तरप्रदेशात काँग्रेसपुढे मोठी आव्हानं आहेत. पक्षाने तिथं एकट्याने निवडणूक लढवण्याचा निर्णय आता तरी घेतलेला आहे; पण काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव इम्रान मसूद यांनी काँग्रेसने समाजवादी पक्षाबरोबर युती करावी, असा विचार बोलून दाखवला आहे. पंजाबमधे झालेल्या घडामोडींमधे काँग्रेसच्या नेतृत्वावर खूप टीका झाली. कॅ अमरिंदर सिंग यांच्यासारख्या अत्यंत सक्षम आणि देशभक्त मुख्यमंत्र्याला केवळ अंतर्गत राजकारणामुळे आणि राजकारणात तुलनेने नवख्या असलेल्या नवज्योतसिंग सिद्धूमुळे पद सोडावं लागलं. ही गोष्ट अनेकांच्या पचनी पडली नाही. काँग्रेसमधेही बंडाचं वातावरण तयार झालं. कपिल सिब्बल यांच्यासारख्या २३ नेत्यांनी पक्षात घडणाऱ्या घडामोडीबद्दल नाराजी व्यक्त करत पक्ष नेतृत्वावरच शंका घेतली. त्यानंतर सोनिया गांधी यांनी काँग्रेसच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत काँग्रेसच्या आपणच नेत्या आहोत आणि कुणीही आपल्याशी थेट बोलावं, मीडियातून नाही, असं खडसावलं होतं. त्यामुळे आता काँग्रेसचं नेतृत्व नि:संशयपणे सोनिया गांधी यांच्याकडेच आहे, हे स्पष्ट झालं.

तरच काँग्रेसचे अच्छे दिन

राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसचं नेतृत्व सोनिया गांधी करत असल्याचे फायदे आता काँग्रेसला होतील, यात शंका नाही. एक तर भाजपविरोधात विरोधी पक्षांची आघाडी करायची झाल्यास त्याचं नेतृत्व आपसूकच काँग्रेसकडे येईल. कारण, इतर विरोधी पक्षांत बहुतांश प्रादेशिक पक्ष आहेत आणि आपापल्या राज्यांपलीकडे त्यांना फारसा जनाधार नाही. काँग्रेस राष्ट्रीय पक्ष आहे आणि आता त्याचं बळ कमी झालं असलं, तरी तो पक्ष संपलेला नाही. शिवाय, सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली दोनवेळा काँग्रेसने केंद्रात सत्ता मिळवली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या उत्तर प्रदेशातल्या कामगिरीकडे संपूर्ण देशाचं लक्ष असणार आहे. प्रियांका गांधींना हे सगळं लक्षात ठेवून रणनीती आखावी लागणार आहे. उत्तरप्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने धडाकेबाज कामगिरी केली आहे; पण त्याचबरोबर त्यांच्याविरोधात विरोधक एकवटणार हेही खरंच आहे.

# मराठी रहस्यकथेचा 'बेताज बादशहा'

**मराठी रहस्यकथेला जागतिक विक्रमाच्या यशोशिखरावर नेणारे लोकप्रिय लेखक, पत्रकार, गोमंतकीय सुपुत्र गुरुनाथ नाईक यांचे निधन ही मराठी साहित्य विश्वाची फार मोठी सांस्कृतिक हानी आहे. रहस्यकथा लेखक बाबुराव अर्नाळकर यांचा विक्रम मोडीत काढून तब्बल १ हजार १०८ कादंबऱ्या लिहिणाऱ्या गुरुनाथ नाईकांनी केवळ प्रादेशिक भाषेतच नव्हे तर भारतीय भाषांमध्ये सर्वाधिक कादंबऱ्या लिहिण्याचा विक्रम केला. त्यांच्या या लेखन विक्रमाची नोंद लिमका बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डलाही घ्यावी लागली.**



श्रद्धांजली

**प्रभाकर ढगे**

इंग्रजी साहित्यातील लोकप्रिय रहस्यकथा लेखिका आगाथा ख्रिस्ती यांच्या कादंबऱ्यांची जशी तेथील वाट पाहात, तशाच प्रकारची अफाट वाचकप्रियता लाभलेले गुरुनाथ नाईक यांच्या रहस्य कादंबऱ्यांची वाट पाहिली जायची. कलेसाठी कला की जीवनासाठी कला, अशा कुठल्याही साहित्यिक वादात अडकून न पडता 'मी माझ्या वाचकांसाठी लिहितो', अशी प्रांजळ कबुली देत आयुष्यभर ही भूमिका जपली. गुरुनाथ विष्णू नाईक यांचे मूळ घराणे अडवई- सत्तरीचे राणे. नंतर त्यांचे आजोबा विठ्ठलापूर-साखळी येथे स्थायिक झाले. सत्तरीतील राणे घराण्यांनी वेळोवेळी तत्कालीन पोर्तुगीज राजवटीविरुद्ध बंडे पुकारली होती. नाईक यांचे आजोबा हे त्यावे पोर्तुगीज सैन्

यात लेफ्टनंट या पदावर कार्यरत होते. १९०१ मध्ये सत्तरीमध्ये राणे सरदारांनी पोर्तुगीज सत्तेविरूध्द मोठा उठाव केला. या उठावाच्या वेळी नाईक यांच्या आजोबांनी पोर्तुगीज सैन्यात असूनही बंड पुकारले आणि ते स्वातंत्र्य सैनिकांना सामील झाले. १९०३ मध्ये बेसावध असताना ते पोर्तुगीज सैन्याच्या तावडीत सापडले. पोर्तुगीजांनी त्यांना २८ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली. अनेक बंडखोर सरदारांसोबत त्यांची रवानगी तिमोर बेटावर करण्यात आली. या काळात गुरुनाथ नाईक यांच्या आजी गरोदर होत्या. त्या देखील पोर्तुगिजांविरुद्ध काम करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक संघटनेच्या महिला प्रमुख होत्या. पोर्तुगिजांची अटक चुकवित त्या विठ्ठलापूर येथे आल्या. ओळख लपविण्यासाठी त्यांनी राणे ऐवजी नाईक हे नवीन आडनाव धारण केले. तेव्हापासून राणे असलेल्या या घराण्याला नाईक हे आडनाव लागले. गुरुनाथ नाईक यांना आपल्या पराक्रमी पूर्वजांचा खूप अभिमान होता. त्याची कथाबिजे त्यांच्या काही ऐतिहासिक कादंबऱ्यांतून विखुरलेली दिसतात. गुरुनाथ नाईक हे रहस्यकथाकार म्हणून अधिक लोकप्रिय असले तरी ते ऐतिहासिक कादंबरीकार देखील होते. छत्रपती शिवाजी महाराजांवरील त्यांची कादंबरी आजही मराठीतील एक उत्कृष्ट कलाकृती मानली जाते. शिवकालातील प्रसिद्ध गुप्तहेर बहिर्जी नाईक यांच्यावर प्रदीर्घ लेखमाला लिहिणारे गुरुनाथ नाईक हे पहिले मराठी लेखक आहेत. शब्दवेधी आणि गोलंदाज या ऐतिहासिक कथालेखनातून त्यांचे हेच कसब दिसून येते.

गुरुनाथ नाईक हे रहस्यकथा लिहिण्यापूर्वी १९५७ ते १९६३ या काळात संगीतिका, नभोनाट्य, श्रुतिका असे लेखन करायचे. याच काळात गुरुनाथ नाईक यांनी अनेक मराठी मासिकांतून हेमचंद्र साखळकर आणि नाईक या टोपण नावाने लेखन केले. मराठी साहित्य लेखनावर उपजिविका करता येत नाही, हे लक्षात आल्यानंतर ते पत्रकारितेकडे वळले. गोव्यातील दैनिक 'गोमंतक'मध्ये त्यांनी पत्रकारितेला सुरूवात केली. त्यानंतर काही काळ त्यांनी मुंबईत पत्रकारिता केली. मुंबईनंतर मराठवाड्यातील पहिले दैनिक अजिंठामध्ये ते कार्यकारी संपादक बनले. या ठिकाणी पाच वर्षे राहिल्यानंतर जालना येथील दैनिक दुनियादारीचे संपादक बनले. त्यानंतर काही काळ कोल्हापूर, पुणे, लातूर अशा विविध शहरातील नामांकित दैनिकांचे ते संपादक म्हणून कार्यरत होते. पत्रकारितेतील काम सांभाळून कादंबरी लेखनाचा झपाटा त्यांनी कायम ठेवला होता. सुरूवातीला दोन ते अडीच दिवसात एक कादंबरी एवढ्या वेगाने ते लेखन करायचे. गुरुनाथ नाईक यांच्या कादंबरी लेखनाला साधारणपणे १९७० साली सुरूवात झाली. पुणे येथील सदानंद प्रकाशनच्या प्रकाशकांनी त्यांना प्रथम दोन रहस्य कथा लिहून द्यायला सांगितल्या. गुरुनाथ नाईक यांनी त्या तत्काळ लिहून दिल्या. हा प्रसंग गुरूनाथ नाईक यांनी एका दिवाळी अंकात कथन केला आहे. मृत्यूकडे नेणारे चुंबन' आणि 'शास्त्रज्ञाच्या मृत्यूचे गूढ' या दोन रहस्य कादंबऱ्यांनी त्यांच्या कादंबरी लेखनाचा श्रीगणेशा झाला. या दोन्ही कादंबऱ्या आवडल्याने प्रकाशकांनी तत्काळ छपाईला घेतल्या. या पहिल्याच दोन कादंबऱ्यांना वाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. त्यानंतर गुरुनाथ नाईक यांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी रहस्यकथा लेखनात नवा इतिहास रचून ते विक्रमवीर ठरले. गुरुनाथ नाईक यांची सरासरी शंभर पानांची एक कादंबरी असायची. दरमहा सात ते आठ कादंबऱ्या असा त्यांच्या लेखनाचा वेग राहिला. १९७० ते १९८२ या बारा वर्षात गुरुनाथ नाईक यांनी ७२४ रहस्य आणि गूढकथा लिहिल्या. यामध्ये सैनिकी जीवनाचा थरार वर्णन करणाऱ्या २५० शिलेदार कादंबऱ्या आहेत. गोलंदाज ही एक नावीन्यापूर्ण काल्पनिक व्यक्तिरेखा उभी करून त्यांनी १५० कथा रचल्या. कॅप्टन दीप, मेजर भोसले, शिलेदार, धुरंदर ही त्यांची पात्रे रहस्यकथा वाचणाऱ्या वाचकांच्या मनावर गारूड करणारी आहेत. लष्करातील जगण्याचे आकर्षण आणि आपल्या दोन भावांचा सैन्यातील अनुभव यावर त्यांनी अनेक रहस्यमय कथानके उभी केली.

मराठीत नारायण धारप, अशोक व्हटकर, बाबा कदम, सुहास शिरवळकर, चंद्रकांत काकोडकर, एस. एम. काशिकर, अशोक थोरे अशी अनेक रहस्यकथा लेखकांची फळी उभी राहिली. पण गुरुनाथ नाईक हे या सर्वांचे शहेनशहा ठरले. 'मराठी रहस्यकथेला वेगळे वळण देण्याचे कामही त्यांनी केले. नाट्यप्रधान सुरुवात व नाट्यमय शेवट ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये ठरली. घटनाप्रधान कथानक आणि गतीमान प्रसंगांनी त्यांच्या कादंबऱ्या आजही तेवढयाच लक्षवेधी आहेत.

मराठी साहित्यात रहस्यकथेचा नवा मानदंड निर्माण करणारा हा महान लेखक मात्र हयातभर उपेक्षितच राहिला. त्यांच्या लेखन विक्रमाची दखल घेण्याचे साधे सौजन्यही साहित्यातील किरट्या आणि क्रूर द्धुद्धाचार्यांनी दाखवले नाही. गुरुनाथ नाईक यांची हातोहात खपणारी पुस्तके छापून अनेक प्रकाशक मालामाल झाले. पण साहित्यात उत्तुंग कामगिरी करताना जगण्याचे व्यावसायिक गणित विसरलेल्या या प्रतिभावंताला आपले अखेरचे दिवस मात्र आर्थिक विपन्नता व हलाखीतच काढावे लागले. लेखक - कलाकाराला जगविणारी सधन संपन्नता आपल्या सांस्कृतिक जीवनात आजही आपण उभी करू न शकल्यामुळे गुरुनाथ नाईक यांच्या सारख्या प्रज्ञावंतांच्या वाट्याला अशी कटू परिस्थिती येते. कुठल्याही गटातटात, कंपूशाहीत आणि वर्तुळात नसलेल्या या स्वतंत्र वृत्तीच्या 'बेताज बादशहा'च्या साहित्याचे मूल्यमापन करून सुयोग्य सन्मान बहाल करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

ता.क. गुरुनाथ नाईक यांच्यावरील माहितीपट निर्मितीचे काम अॅड. कृष्णा नाईक व मी सुरू केले होते. पण काही अडचणीमुळे ते अर्धवट राहिले. माहितीपट पूर्णत्वास नेण्यासाठी आम्ही नक्कीच प्रयत्न करू.

: सौजन्य/दैनिक गोमंतक



## 'दीपपर्व'चे सर्व स्तरातून स्वागत!

माजलगाव : दर्जेदार दिवाळी अंकांची परंपरा जपण्याऱ्या वर्तमान माध्यम समुहाच्या 'दीपपर्व२०२१'चे सर्व स्तरातून स्वागत झाले आहे. समाजकारण, राजकारण, उद्योग, आरोग्य आणि सिनेक्षेत्रातील महनीय व्यक्तींनी 'दीपपर्व'चे कौतुक केले आहे. यात उद्योगपती माधव निर्मळ, माजी आमदार आर.टी.देशमुख, नगराध्यक्ष शेख मंजूर, डॉ.शामसुंदर काकाणी, किराणा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सोळंके, अभिनेत्री सविता इतापे, झी मराठी वाहिनीवरील 'तुझ्यात जीव रंगला' फेम वहिनीसाहेब ऊर्फ माधुरी पवार आदींचा समावेश आहे.



# दिलेल्या शब्दांची आमदार संदिप क्षीरसागर यांच्याकडून वचनपूर्ती

प्रतिनिधी



बीड : मागील काळात अनेक ठिकाणी विकास कामे करण्याचे दिलेले शब्द आज विकास कामे प्रत्यक्ष सुरू करून पुर्ण होत असतांना याचा मनापासून आनंद वाटतो. पुरोगामी विचार घेवून सर्वांना सोबत घेवून गेल्या पंचवीस वर्षात जो विकास झाला नाही तो विकास करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेल. १९६० पासून पापनेश्वर मंदिरा संदर्भातील वाद मिटला. मुस्लिम समाजाचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचेही आभार. मंदिर परिसराच्या विकासासाठी कुठेच कमी पडणार नाही, मोठ्या प्रमाणात निधी देईल, कामेही गुणवत्ता व दर्जेदार करून घेवू असे प्रतिपादन आमदार संदिप क्षीरसागर यांनी केले.

बार्शी नाका परिसरातील प्रसिद्ध पापनेश्वर मंदिरासमोरील ९ लक्ष रूपयांच्या सभामंडपाचे भूमिपुजन व दोन लक्ष रूपयांच्या पथदिव्याचे लोकार्पण मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. सोमवार दि.८ नोव्हेंबर २०२१ रोजी बीड शहरातील तेलगाव नाका परिसरातील प्रसिद्ध पापनेश्वर मंदिरासमोर आमदार संदिप क्षीरसागर यांच्या स्थानिक निधीमधून ९ लक्ष रूपयांच्या सभा मंडपचे भूमिपुजन व २ लक्ष रूपयांच्या सौर पथ दिव्याचे लोकार्पण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पेठ बीडचे नेते, बहिरवाडीचे माजी सरपंच आसाराम गायकवाड हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार सुनिल धांडे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अॅड.डी.बी.बागल यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार संदिप क्षीरसागर म्हणाले की, बीड नगर पालिका विकास कामात अडथळा आणत असून एनओसी सुद्धा देत नाही. परंतू आपण विकास कामात कोठेच कमी पडणार नाही. कोरोना काळातही शहरासाठी आणि ग्रामीण भागासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला. सार्वजनिक हिताची कामे प्राधान्याने करून घेणार. त्याची गुणवत्ता आणि दर्जा टिकला पाहिजे यासाठीही कडक सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. येणाऱ्या निवडणूकीत आपल्यासमोर कोणीच विरोधक नाही, त्यामुळे त्यांचे नावही कोणी घेत नाही. परंतू आशा लोकांना आता जनतेने ओळखून घरी बसवलं पाहिजे. विकासाची जबाबदारी आता आम्ही उचलली आहे ती पूर्ण करू अशी ग्वाही ही आमदार संदिप क्षीरसागर यांनी दिली.

# माजलगावात होणार जिल्ह्यातील पहिले फिजिओथेरपी महाविद्यालय

### गूरूकृपा शिक्षण संस्थेची गरूडझेप

प्रतिनिधी




माजलगाव : बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात डॉ.यशवंत राजेभोसले यांच्या गुरूकृपा इन्स्टिट्यूटने आपला झेंडा उंचावला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील फिजिओथेरपी शाखेचे बीड जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय माजलगाव परिसरात सुरू होत आहे.


माजलगाव शहरातील नामांकित ऱ्हदयरोगतज्ज्ञ डॉ.यशवंत राजेभोसले यांनी गुरूकृपा इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून मागील पाच वर्षात माजलगाव परिसरात उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली केली आहेत. डी.फार्मसी, बी.फार्मसी कॉलेजनंतर आता बीड जिल्ह्यातील पहिले फिजिओथेरपी कॉलेज सुरू होत आहे. फिजिओथेरपी हा साडे चार वर्षाचा अभ्यासक्रम असून ६० विद्यार्थ्यांच्या शाखेस मान्यता मिळाली आहे. नीट परीक्षेत पात्र विद्यार्थी या वैद्यकीय क्षेत्रातील कोर्ससाठी पात्र असतो. सध्या मुलींचा जास्त ओढा फिजिओथेरपीकडे असून भविष्यात फिजिओथेरपीमध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. नाशिकच्या वैद्यकीय विद्यापीठाशी हे संलग्न असून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. गुरूकृपा इन्स्टिट्यूट फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. भविष्यातील कसल्याही स्पर्धेस तोंड देण्याच्या दृष्टीने विद्यार्थी घडवला जाणार आहे, असे गूरूकृपा इन्स्टिटट्यूटचे सर्वेसर्वा डॉ.यशवंत राजेभोसले यांनी सांगितले.



### मैत्रीचा 'जिव्हाळा'

तेलगाव : येथील जिव्हाळा अर्बन कार्यालयात वाढदिवसानिमित्त संपादक बाबा श्रीहरी देशमाने यांचे स्वागत करताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते अविनाश गवळी, जिव्हाळा अर्बनचे चेअरमन विलास कारके.




















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.